# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Jaulka**

**Date of Good Work done** :- **04/10/2022**

**Brief of the work done :-**

चोरीचा माल घेणाऱ्यास चोरट्यासह अटक ; 01.40 लाखांचा मुद्देमाल जप्त.

## चोरीचा माल घेणे पडले महागात

**जऊळका रेल्वे ता. ३ :** जऊळका रेल्वे येथील समृद्धी महामार्गाचे काम सुरू आहे. बांधकामासाठी लोखंडाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

हे लोखंड चोरून विकण्याचा धंदाही तालुका परिसरात बिनदिक्कतपणे सुरू आहे. आजूबाजूच्या जिल्ह्यातून भंगार खरेदी करणारेही येथे येऊन माल बनवत आहेत. ज्यामध्ये परिसरातील ग्रामीण भागातून चोरीला गेलेल्या शेती अवजारांचाही समावेश करण्यात येत आहे. अशाच एका प्रकरणात जउळका रेल्वे येथील शेतकऱ्याच्या मुंगसाजी महाराज मंदिरा मागील कोठ्यातून बैलगाडी ची ३ लोखंडी चाके २ ऑक्टोबर च्या सकाळी ७ वाजता चोरून भंगार व्यापाऱ्याला विकल्यावर प्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून जउळका रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी एकनाथ भगवान वऱ्हाडे, वय ४० रा. जउळका रेल्वे तालुका मालेगाव यांनी महादेव विश्वनाथ आगलावे रा. जउळका रेल्वे, सलीम खान लाल खान पठाण रा. मालेगांव व एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध दिलेल्या फिर्यादीवरून सदर आरोपींनी आज सकाळी ७ वाजता मुंगसाजी महाराज मंदिराच्या मागे असलेल्या फिर्यादीच्या कोठ्यातून बैलगाडीची ३ लोखंडी चाके, ज्याची किंमत अंदाजे ६००० रुपये आहे, चोरून सलीम खान लाल खान यांना विकले. सदरील चाके एम.एच. ३८ ई. ११९८ क्रमांकाच्या ऑटोसह पकडून पोलीस ठाण्यात आणण्यात आली.

या प्रकरणी एकनाथ वाडे यांच्या फिर्यादीवरून जउळका रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २२५/२०२२ नोंदवून भादंवि कलम ३७९, ४११, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून ऑटो सह १३७००० रुपयांचा भंगार जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा तपास ठाणेदार अजिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नायब पोलिस कांस्टेबल सुनील काळदाते करीत आहेत.